# - - : प्रेस नोट : - -

## ग्रामपंचायत निवडणूकीत नामनिर्देशन Online करणे अनिवार्य

हिंगोली जिल्ह्यातील 467 ग्रामपंचायतींमध्ये निवडणूकीचा कार्यक्रम दिनांक 23/06/2015 रोजी मा. राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेला आहे. यामध्ये ग्रामपंचायत निवडणूकीत नामनिर्देशन Online करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

इच्छुक उमेदवारांनी https://panchayatelection.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर (website) जावुन प्रथम स्वत:च्या नावानिशी नोंदणी (Registration) करावयाची आहे. यामुळे इच्छुक उमेदवारांचे Login व Password त्यांना प्राप्त होणार आहे. नोंदणी (Registration) करतांना उमेदवारांना विभाग, तालुका, ग्रामपंचायत, वार्ड इत्यादीची माहिती नमुद करुन आपला भ्रमणध्वनी (Mobile) नंबरही नमुद करावयाचा आहे. या प्रक्रीयेनंतर उमेदवारांना उक्त संकेतस्थळावर (website) Online नामनिर्देशनाची माहिती भरावयाची आहे. या नामनिर्देशनाची माहिती इंग्रजी अथवा मराठी या दोन्हीहा भाषेत भरावयाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. या व्यतिरीक्त उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत लागणाऱ्या इतर कागदपत्रांची पुर्तता देखील करावी लागणार आहे.

उमेदवारांनी परिपूर्ण नामनिर्देशनपत्राची Online प्रत / Print काढुन घ्यावी व आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे दाखल करावी.

उपरोक्त सर्व प्रक्रीयेसाठी संगणक, प्रींटर व इंटरनेट इत्यादींची उपलब्धता असणे गरजेचे आहे. उमेदवारांकडे अशा प्रकारची सुविधा नसल्यास त्यांना नजीकच्या महा ई-सेवा केंद्र / Cyber Café अथवा या प्रकारची कामे करणाऱ्या संस्थांशी संपर्क करता येऊ शकेल.

जिल्ह्यातील सर्व नामनिर्देशपत्रे 100 टक्के Online करावयाची असल्यामुळे उमेदवारांनी वेळीच दखल घेवुन उक्त प्रमाणे कार्यवाही करावी व ही कामे विहित मुदतीत पूर्ण होतील यासाठी दक्ष राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी श्री तुकाराम कासार, भा.प्र.से. यांनी केले आहे.

**जिल्हाधिकारी, हिंगोली**